**प्रेस नोट** दि. ३०/१२/२०२३

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

३१ डिसेंबर, २०२३ व नुतनवर्ष स्वागत २०२४

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत ३१ डिसेंबर व नुतवर्षाच्या स्वागतासाठी गर्दीचे ठिकाणी व संवेदनशील भागात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून योग्य खबरदारी घेण्यात आलेली आहे. नुतनवर्षाच्या स्वागतासाठी पिंपरी चिंचवड शहरात पिंपरी, चिंचवड, वाकड, हिंजवडी परिसर, विविध मॉल्स, हॉटेल्स, चर्च याठिकाणी लोक एकत्र येतात. याकरीता नमुद ठिकाणी चेकींग करण्यात येत आहे. संशयीत व्यक्ती, अभिलेखावरील गुन्हेगार चेक करुन योग्य ती खबरदारी घेण्यात येत आहे.

३१ डिसेंबर, २०२३ व नुतनवर्ष स्वागता दरम्यान कोठेही घातपाताची घटना घडणार नाही. चेंगरा-चेंगरी होणार नाही. नागरीकांच्या मालमत्तेचे संरक्षण करणे (विशेषतः महिलांची सुरक्षितता,स्नॅचींग, पिक पॉकेटींग गुन्हयास प्रतिबंध करणे) ही बंदोबस्ताची उद्दीष्टे निश्चित करण्यात आलेली आहेत.

आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रामध्ये येणा-या-जाणा-या मार्गावर पोलीस स्टेशन व वाहतूक शाखा, यांचे संयुक्तपणे प्रभावी नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच वाहतुक शाखेकडून ट्रीपल सीट, मॉडीफाय सायलेंन्सर, ड्रंक अॅन्ड ड्राईव्ह व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे यांचेवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. तसेच गुन्हे शाखेकडून चैन स्नॅचींग, पिक पॉकेटींग व महिला बाबत अपराध करणा-या इसमांवर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात ३१ डिसेंबर व नुतनवर्षाच्या स्वागताच्या अनुषंगाने खालील प्रमाणे बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

| अपोआ | पोउपआ | सपोआ | पोनि | सपोनि/पोउपनि | अंमलदार | स्ट्रायकींग | दामिनी पथक | छेडछाड विरोधी पथक | आरसीपी | क्युआरटी | पेट्रोलिंग मोबाईल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०४ | ०९ | ४२ | १५४ | १३५७ | ०८ | ३३ | ०३ | ०५ | ०३ | ६५ |

**वाहतुक शाखा बंदोबस्त**

| पोउपआ | सपोआ | पोनि | सपोनि/पोउपनि | अंमलदार | नाकाबंदी पॉईट | डी.डी.पथक |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | १२ | २६ | २४१ | ४० | ३० |

तसेच महत्वाचे व गर्दीच्या ठिकाणी फिक्स पॉईट व पेट्रोलिंगचे आयोजन केलेले आहे. तसेच काही आक्षेपार्ह माहिती मिळाल्यास नागरीकांनी तात्काळ डायल ११२, नियंत्रण कक्ष०२०-२६२०९१२२/ २६२०९१२७ यावर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**नविन वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा**